|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/४३४८/२०२० दिनांक: २८/१२/२०२०

प्रति,

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक

२) कबचौउमविंतर्गत सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि विभागांचे मा.विभागप्रमुख

विषय : Mercy Chance/ संधी मान्य करण्यात आलेल्या व श्रेणी/ गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत नाव नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत .......

संदर्भ : विद्यापीठाने दिनांक ११.०६.२०२० रोजी निर्गमित केलेले परिपत्रक क्र.१७१/२०२०.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, विद्यापीठाने उन्हाळी परीक्षा २०२० मधील अंतिम सत्र/ वर्ष वगळून इतर परीक्षांच्या निकालाच्या कार्यवाहीबाबत संदर्भिय परिपत्रक निर्गमित केलेले होते.

सदरच्या परिपत्रकातील पान क्र.०२ वर, "परीक्षा न घेता विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्याच्या पध्दतीबाबत" मुद्दा क्रमांक (इ) मधील ३) व ४) मध्ये खालील बाब नमूद करण्यात आली होती.

३) अध्यादेश ६७ नुसार उन्हाळी २०२० परीक्षेकरीता अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांना Mercy Chance/ संधी मान्य करण्यात आलेली आहे, त्यांना देण्यात आलेली संधी ग्राह्य धरुन माहे ऑक्टोबर/ नोव्हेंबर-२०२० मध्ये होणा-या परीक्षेत संधी देण्यात येईल.

४) अध्यादेश १७४ नुसार श्रेणी/गुणवत्ता सुधार करण्यासाठी अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा उन्हाळी २०२० च्या परीक्षेच्या वेळी न घेता, त्यांना देण्यात आलेली संधी ग्राह्य धरुन माहे ऑक्टोबर/ नोव्हेंबर-२०२० मध्ये होणा-या परीक्षेत संधी देण्यात येईल.

तरी संदर्भिय परिपत्रकात नमूद केलेल्या मुद्दा क्रमांक ०३ च्या अनुषंगाने, सर्व संबंधित विद्यार्थ्यांना माहे डिसेंबर-२०२०/ जानेवारी-२०२१ मध्ये होणा-या परीक्षांसाठी प्रविष्ठ होण्याबाबत सूचित करावे, ही विनंती. सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही. तथापि, त्यांना विद्यापीठामार्फत नवीन बैठक क्रमांक देण्यात येणार असून, त्यानुसार त्यांनी सदरची परीक्षा द्यावयाची आहे. त्यासाठी आपण विद्यापीठातील संबंधित विद्याशाखांचे नियंत्रक अधिका-यांशी संपर्क साधून विद्यार्थ्यांचे नवीन बैठक क्रमांक उपलब्ध करुन घ्यावेत, ही विनंती.

त्याचप्रमाणे संदर्भिय परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ०४ च्या अनुषंगाने विद्यापीठाने श्रेणी/गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत नाव नोंदणी करणेसाठी पत्र क्र.कबचौउमवि/७अ/श्रेणी सुधार/४२५५/२०२०, दिनांक १७.१२.२०२० निर्गमित केले असून, सदर पत्रात नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने कार्यवाही करावी, ही विनंती.

(भ. प्र. पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:-

१) परीक्षा व मूल्यमापन विभागातील सर्व विद्याशाखांचे नियंत्रक अधिकारी, कबचौउमवि, जळगाव

२) यंत्रणा विश्लेषक/ विशेष कार्य अधिकारी, परीक्षा (संगणक) विभाग, कबचौउमवि, जळगाव

Scanned with CamSc